प्रकरण सहावे

उपसंहार

प्रकरण सहावे

उपसंहार

इ. सन १८०० ते. १८७४ हा कालखंड वाङमयीनदृष्ट्या संक्रमणाचा, पूर्वतयारीचा आणि पायाभरणीचा म्हणून ओळखला जातो. राजकिय, सामाजिक, शैक्षणिक आणि वाङमयीन अशा क्षेत्रात १८७४ नंतरच्या काळात अनेकांकडून जे अविस्मरणीय असे कार्य झाले त्या सर्वांचे बीज या काळखंडात रूजल्याचे दिसून येते. नंतरच्या काळात जे वैचारिक प्रबोधन झाले त्याचाही प्रांभ १८५० किंवा त्याच्या आसपास झालेला दिसतो. पूर्व - परंपरा काहीही नसताना अनुकरण, अनुवाद आणि अभ्यास यांच्या बळावर या काळातील बहुसंख्य लेखकांना न रुळलेली वाट शोधून काढावी लागली. त्याचे ऋण मान्य करुनच त्यांचा ध्वज खांद्यावर घेऊनच या पुढच्या वाङमयकारांनी वाटचाल केली आहे.

१८०० ते १८७४ हा कालखंड म्हणजे आधुनिक मराठी वाङमयाचे आरंभस्थान या कालखंडास, अव्वल इंग्रजी कालखंड असेही म्हटले जाते. या कालखंडाची कहाणी ही आधुनिक मराठी वाङमयाच्या शुभारंभाची कहाणी आहे. या कालखंडासंबंधी विविध अभ्यासकांनी काही अभिप्राय व्यक्त केलेले आहेत. 'या पाऊणशे वर्षात एकही अलौकिक ग्रंथ मराठीत झाला नाही'. 'हा कालखंड म्हणजे भाषांतर युग होय'. 'हा कालखंडा प्राध्यान्याने भाषांतराचा असला तरी पुढील उज्ज्वल कालखंडाच्या पूर्वतयारीचाही होता'. अव्वल इंग्रजीतील वाङमय पाहताना जाणवते की 'तारांगण पुष्कळ उगवला पण तमोनाशक चंड मात्र कोठेच आढळला नाही' 'या कालखंडातील साहित्यात स्वतंत्रतेचे फारसे तेज नसले तरी, विविधतेचे वैभव जरुर आहे'. हा कालखंड म्हणजे आधुनिक मराठी साहित्याच्या पूर्वतयारीचा कालखंड होय. १८८० नंतर नवीन स्वतंत्र ललित वाङमय, चरित्रे, टीका इ. सर्व वाङमय प्रकारांना बहर प्राप्त झाला, त्यासाठी जी पूर्वतयारी आवश्यक होती ती या कालखंडात झाली असे म्हणावे लागेल. हा कालखंड पाऊणशे वर्षाचा म्हणजे वाङमयाचा इतिहासाच्या दृष्टीने अल्पकाळ तरीही विकास साधता आला, याचे कारण इंग्रजी वाङमयाचा आधार त्याच्या अभ्यास परिचयामुळे वाङमय विकासाला गती मिळाली. 'अर्वाचीन मराठी वाङमय हे मराठी वाङमयावर इंग्रजी वाङमयाचे कलम झाल्यामुळे प्राप्त झालेले फळ आहे असे म्हटले जाते. हे कलमाचे फळ वेगळ्या स्वरुपाचे, अधिक सकस, भरदार व अल्पावधीत लागले.

यावेळी योजनापूर्वक वाङमयनिर्मिती झाली. इंग्रजांचे शासन परकिय खरे. पण या शासनाने वाङमय निर्मितीची योजना आखली व तडीस नेली. वाङमयास वळण लावण्याचा सहेतूक प्रयत्न केला. जित लोकांचे सहाय्य आपणास मिळत राहवे, अशा स्वार्थी हेतूने का होईना, ब्रिटीश राज्यकर्त्यांनीमराठीमध्ये ग्रंथ निर्मिती करवून घेण्याचे प्रयत्न केले. त्यात साहजिकच शालेय व शैक्षणिक वाङमयाचा वाटा मोठा होता. यामुळेच मराठी गद्याला विशिष्ट वळण लागले. काव्यनिर्मितीलाही दक्षिणा प्राईस कमिटीकडून उत्तेजन मिळत गेले. धर्मप्रचाराच्या हेतूने परकिय मिशनऱ्यांनीही वाङमयनिर्मीतीस प्रेरणा दिली. पण अशा धर्मप्रचारालाही विरोध करण्याऱ्या एत्तदेशीयांच्या वाङमयालाही, त्यांच्या या प्रयत्नामुळे जन्म मिळाला. परकिय, धर्मप्रचारकांचा, मराठी वाङमयावर हा दुहेरी उपकारच झाला असे म्हणता येईल.

१८०० ते १८७४ या कालखंडातील गद्य वाङमयाचा प्रमुख हेतू ज्ञानसंपादन व ज्ञानप्रसार हा होता. म्हणून 'अनेक विद्या मूलतत्वसंग्रह' करण्यात आला ' सिद्धपदार्थ विज्ञान विषयक संवाद' लिहले गेले. त्या कालखंडात निघालेली वृत्तपत्रे आणि मासिके यांची नांवे पाहिली तरीही ज्ञानसंपादनाची आणि त्याच्या प्रसाराची दृष्टी किती उत्कट होती याची कल्पना येते. 'ज्ञानोदय' 'ज्ञानप्रकाश', 'ज्ञानयज्ञ' ही काही वृत्तपत्रांची नावे आहेत. तर 'ज्ञानचंद्रोदय' 'ज्ञानप्रसारक', 'ज्ञानदर्पण', विविध ज्ञानविस्तार', 'ज्ञान संग्रह' ही काही मासिकांची नावे आहेत.

नियतकालिकांचा उदय हे या कालखंडाचे मोठे वैशिष्ट्य आहे. अर्थात वर्तमान म्हणजे बातमी सागण्यापेक्षा ज्ञान प्रसार, मतप्रकटन किंवा विचारजागृती ही या नियतकालिकांची उद्दिष्टे असत. वाङमय निर्मितीस त्याचे स्वरुप अधिक अनुकूल असे. यातूनच अर्वाचीन मराठीतील एक महत्वाचा वाङमय प्रकार जन्म पावला तो म्हणजे निबंध होय. या नियतकालिकामधून येणारे लेख, अग्रलेखआणि केंव्हा केंव्हा पत्रेही निबंधाच्या स्वरूपाची असत. धार्मिक विचार - आचार, सामाजिक विषय यासंबंधी निबंध असत. मुद्रणसुकतेमुळे, नियतकालिकांचा संभव व त्यांच्याद्वारे झालेली विचारजागृती आणि विचारांचा संघर्ष आणि त्यातून वाङमयनिर्मिती अशी ही परंपरा आहे. आपला परकियांशी आलेला संबंध, अर्थात या सर्वांच्या मुळाशी आहेच.

इ. सन १८०० ते १८७४ या कालखंडातील वाङमय निर्मितीमध्ये म्हणजेच पर्यायाने कादंबरी निर्मिती मागे ज्ञानप्रसार, इंग्रजी विद्येचा प्रभाव, ख्रिस्ती धर्मप्रसार या तीन महत्वाच्या प्रेरणा तर,

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

होत्याच परंतू इतरही प्रेरणा होत्या. समृद्ध इंग्रजी व संस्कृत वाङमय मराठीत आणावे, समाजाचे प्रबोधन व्हावे, इतिहास, भूगोल, शास्त्रे या संदर्भातील माहिती मराठीत आणावी म्हणून, शिक्षण घेण्याची संधी मिळाली. त्यामूळे अनेकांना नवी दृष्टी लाभली. शिक्षणाच्या प्रसारामुळे वाचकवर्ग वाढला. मुंद्रण कलेचा प्रारंभ, समाजातील अनिष्ट रुढी परंपरेवर प्रहार करण्यासाठी 'निबंध' हा वाङमयप्रकार अस्तित्वात आला. इंग्रजी शासनाचे अनुकूल धोरण इंग्रजांच्या पुढाकाराने मराठी शब्दकोश, मराठी व्याकरण, मराठी परिभाषा यात संशोधन झाल्यामूळे मराठी भाषेला एक विशिष्ठ वळण दिले गेले त्यामुळे गद्य वाङमय विकसित झाले.

अव्वल इंग्रजीतील कथा वाङमयातूनच कादंबरीची कल्पना रुजली आणि वाढली असे दिसते. कथा आणि कादंबरी हे सर्वस्वी स्वतंत्र, भिन्न व प्रत्येकी स्वयंपूर्ण असे वाङमय प्रकार आहेत. कथेचे तंत्र निराळे, कांदबरीचे निराळे, हे आजचे सर्वमान्य विचार अव्वल इंग्रजी काळात नव्हते. तेंव्हा कथांच्या गुंफणीतून कादंबरीच्या रचनेकडे वळावयाचे हा या काळातील बहुविध कांदबऱ्यांचा एक विशेष म्हणावा लागेल. पण तरीही मराठी कांदबरी ही कथेतून स्फुरलेली, वाढलेली आहे. हे ऐतिहासिक सत्य नाकारता येणार नाही.[१]

हरि केशवजींची 'यात्रिक क्रमण' ही मराठीतील पहिली कादंबरी भाषांतरीत स्वरुपाची आहे. 'कादंबरी' हा शब्द इंग्रजीतील 'Novel' या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून उपयोजण्यात आला. प्रेरणा - बाणभट्टाची कादंबरी. प्रारंभीच्या काळात 'नावल' असाही इंग्रजीतून आलेला मराठी पर्याय होता. पण तो मागे पडून 'कादंबरी' हाच शब्द रुढ झाला. प्रारंभीची अवस्था असूनही अव्वल इंग्रजीतील कादंबरी वाङमयाला - मराठी कादंबरीच्या इतिहासात स्वतंत्र स्थान आहे.

लघुकथा व कादंबरी हे वाङमयप्रकार मराठीने इंग्रजी पावून घेतले. कादंबरीतील संविधानक वर्णने. स्वभाववैशिष्ठ वर्णने, मनोविश्लेषण इ. सर्व आवश्यक गुण पण आधुनिक अंगांना, या पहिल्या लेखकांनीही आपपल्या मगदुराप्रमाणे पण जाणिव राखून स्पर्श केलेला आहे. सर्वच गोष्टींना निश्चित आणि पक्का आकार यावयाचा होता. तत्पूर्वीची एक ठराविक अवस्था या पहिल्या कादंबऱ्यातून व्यक्त होते. ' याचा अर्थ असा नव्हे की, संस्कृत प्राकृतातील ललित वाङमयाची परंपरा व मराठमोळा कथावाङमय यांचा संसर्ग या वाङमयप्रकारात या लेखकांनी सर्वस्वी टाळला. हे. संसर्ग अपरिहार्य होते. पण या संसर्गातून कादंबरी निर्माण झाली ती इंग्रजी वाङमयाचा सहकार्याने व अनुकरणाने.

अव्वल इंग्रजीत, सांस्कृतिक विकासाबाबत मराठी समाजाला पून्हा जणू बाल्यावस्था प्राप्त झाली होती. या बाल्यावस्थेच्या सूचक अशा दोन गोष्टी मरांठी कथा कादंबरी वाङमयात प्रतिबिंबीत झालेल्या दिसतात. पहिली प्रवृत्ती अनुकरणाची भाषांतरीत कथा - कादंबऱ्यांच्या रुपाने ही प्रवृत्ती प्रकट झाली. कथात्मक वाङमय इंग्रजीप्रमाणे उर्दू फारशीतूनही आले. अद्‌भुताची आवड ही बाल्यावस्थेची दुसरी सुचक गोष्ट. त्यावेळची महाराष्ट्राची एकंदर सामाजिक, राजकीय परिस्थिती ही अद्‌भूताच्याच अभिरूचीला अनुकूल झालेली होती. पारतंत्र, पराभूत मनोवृत्ती, पराक्रमाची प्रवृत्ती, मावळलेली मने शिथिल, निष्क्रिय उत्तर पेशवाईतील थिल्लर विलासाची प्रवृत्ती, रेंगाळलेल्या पौराणिक बखरी व उर्दू फारशीतील भाषांतरीत कथांवर पोसलेली आळशी मराठी मने अद्‌भूताकडे अधिकच आकृष्ट झाली. कर्तबगारीला अवकाश नव्हता पण स्वप्नाळू विलासपरतेला भरपूर वाव होता. अशा संस्थानिक, जाहगीरदार - इनामदार यांच्याकडून तत्कालीन मिळमिळीत जीवनात काल्पनिक कथांच्या आश्रयाने अद्‌भूताचा अंश आणू पाहणाऱ्या अद्‌भूतरम्य कादंबऱ्यांची मागणी होवू लागली. तत्कालीन समाजाच्या अभिरूचीचे हे स्वरुप अचूक हेरुन वाईच्या लक्ष्मणशास्त्री हळवे यांनी मुक्तामाला (१८६१) नावाची अद्‌भूतरसप्रधान कादंबरी लिहली. ही आधुनिक मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी म्हणून सन्मानिली गेली. त्यांनी दुसरी 'रत्नप्रभा' (१८७८) नावाची तशीच कादंबरी लिहली.

याच काळात ऐतिहासिक कादंबऱ्यांचा उदय झाला. सत्वजागृतीपोषक आंदोलने सुरु झाली. स्वदेशाच्या इतिहासाबद्दल जागृती होऊ लागली. पराकमी पुर्वजाविषयी तीव्र अभिमान वाटू लागला. १८७१ मध्ये गुंजीकरांची 'मोचनगड' ही पहिली ऐतिहासिक कादंबरी अवतीर्ण झाली. पुढे ऐतिहासिक कादंबऱ्यांची निर्मिती वाढू लागली. जनमानसात इतिहासप्रेम जागृती झाले होतेच. ना.वि.बापट यांनी संभाजी चितुरगडचा वेढा, पानिपतची मोहिम या कादंबऱ्या लिहल्या तर चि.मो.आपटे यांनी 'पुतळाबाई', वि.ज.पटवर्धन यांची 'जुनावाडा', 'हंबीरराव व पुतळाबाई' या कादंबऱ्या लिहल्या.

अद्‌भुतरम्य आणि ऐतिहासिक कादंबऱ्याबरोबरच सामाजिक कादंबऱ्यांचे लेखनही याच काळखंडात सुरू झाले. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे आपल्या लोकांना आपला धर्म व आपल्या रुढी तपासून पहाव्याशा वाटल्या. समाजसुधारणेची चळवळ चालू होतीच. बालविवाह, स्त्री शिक्षण विधवा विवाह इ.प्रश्नावर उलट-सुलट चर्चा होत होतीच. या पार्श्वभूमीवर 'यमुनापर्यटन' ही मराठीतील पहिली सामाजिक कादंबरी बाबा पद्‌मनजी यांनी लिहली. सामाजिक कादंबऱ्या हा वाङ्‌मय प्रकार प्रबोधनासाठी उपयुक्त ठरु शकतो. हे 'यमुना-पर्यटन'ने सिद्ध केल्याने त्या वळणाच्या नंतर विविध

सामाजिक प्रश्न हाताळणाऱ्या अनेक कादंबऱ्या लिहिल्यो. बाल-विवाहामुळे उद्‌भवलेल्या समस्यांचे विवेचन करणारी विनायक दामले यांची 'अवलिया' १८५९ ही कादंबरी खूप लोकप्रिय झाली. ओक यांची 'फिरस्तेदार' (१८८१) रहाळकरांची 'नारायणराव आणि गोदावरी' (१८८४) भानूनाईक यांची 'ताराबाई आणि हिराबाई' या काही कादंबऱ्या या कालखंडात प्रसिद्ध झाल्या. सद्‌गुणी सूण... आनंदीबाई.... हे असे आहे. वाईकर भटजी.... पुरी हौस फिटली... मयूरा .... नाहीनाहीच ना ऐकायचे? ठगाची जबानी.... शिलादित्य.... अशा काही रुपांतरित कादंबऱ्याही प्रसिद्ध झाल्या. या कादंबरी विश्वामुळे मराठी साहित्याच्या क्षेत्रात एक नवे दालन उघडले गेले. मनोरंजन, प्रबोधन.... परिवर्तन.... यासाठी कादंबरी हा वाङ्‌मयीन प्रकार खूपच परिणामकारक ठरतो हे अनेकांच्या लक्षात आले. अन् मराठी कादंबरीला योग्य अशी दिशा दिली.

सारांश : १८०० ते १८७४ हा कालखंड म्हणजे 'नवयुगातील स्वतंत्र मराठी वाङ्‌मयाच्या पूर्वतयारीचा काल असे म्हटले पाहिजे आणि ती पूर्वतयारी अल्पावधीत साधण्यात आली हे विशेष गौरवास्पद आहे.

एखादे साहित्यरुप जेव्हा वाङ्‌मयाच्या दालनात वाचकाचे लक्ष वेधून घेते तेव्हा त्यामागे विशिष्ट भूमिका आणि प्रभावी प्रेरणाशक्ती असते. याप्रमाणेच बाबा पद्‌मजी यांच्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीमागेही काही प्रेरक शक्ती होत्याच. आणि त्यातील पहिली प्रेरणाशक्ती म्हणजे ख्रिस्तीधर्मप्रचार बाबा पद्‌मनजींनी ख्रिस्ती धर्मप्रचार ही प्रेरणा मनात ठेवूनच ब्राह्मण आणि मराठी समाजातील विधवा स्त्रियांची स्थिती किती दु:खकारक होती हे दाखविण्यासाठी नायिकेला महाराष्ट्राच्या अनेक गावांचा प्रवास घडविला व त्यातूनच वेणू, गोदू, भटीणबाई, शिवरामची आई इ. विधवा स्त्रियांच्या करुण कहाण्या आपल्यासमोर मांडल्या आहेत. प्राप्त परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी सुखाचा जीवनमार्ग दाखविणारा एकच मार्ग म्हणजे ख्रिश्चन धर्माचा स्विकार हे जणू ध्येयच त्यांनी ठेवले होते.

'विधवा पुनर्विवाह' हा बाबा पद्‌मजींचा 'यमुना पर्यटन' हे पुस्तक लिहण्याचा दुसरा हेतू. विधवांच्या त्यांच्या खुशीप्रमाणे पुनर्विवाह करावा. याविषयी अजून ज्यांची खात्री झाली नाही त्यांनी आपल्या जातीतील विधवांची कशी दशा आहे ती पहावी म्हणजे त्यांनीही विधवांच्या पुनर्विवाहाचा हेतू पटेल. असे बाबा पदमजी म्हणतात. गोंदू, वेणू, शिवरामची आई भटीणबाई या सर्व विधवांच्याकडे

पाहण्याचा बाबा पद्मजी यांचा दृष्टीकोन एका नमुनेदार सुधारकाचा आहे. पुनर्विवाह न केल्यास विधवा अनैतिक मार्गाने जातात. त्यातून भ्रूबहत्येसारखी पापे घडतात. अनाचार वाढतो. असे बाबा पद्मजी म्हणतात खरे परंतु सगळ्याच विधवा पुनर्विवाह न केल्यामुळे बिघडतात असेही नाही त्यासाठी बाबा पद्मजी मुकाटपणे वैधव्याचे दु:ख भोगणाऱ्या वेणूचे उदाहरण देतात. कोणीही विधवा ख्रिस्ती झाली तर तिला पुनर्विवाह करुन आपले जीवन शिष्टसंमत मार्गाने घालविता येते असे स्पष्ट निदान बाबा पद्मनजी यांनी सांगितले आहे. याबरोबरच बाबा पद्मनजींनी पुनर्विवाह करण्यास मराठी ब्राह्मण जातीतही मान्यता आहे हे पटवून देण्यासाठी मनुचे वचन, पराशराचे वचन याचाही आधार घेतलेला आहे. याबरोबरच पुरवणी अंकात वैदिक काळात विधवेचा पुनर्विवाह करण्याची चाल होती हे पटवून दिले आहे. तसेच महाराष्ट्र व गुजराथी पुनर्विवाहाची संख्या, पुनर्विवाहासंबंधी कायदा, हिंदू विधवांची झालेली लग्ने इ.माहितीही दिली आहे.

हिंदू धर्मातील अनिष्ट रुढी व या रुढीमुळे विधवांना भोगावी लागणारी दु:खे हेही उलघडून दाखविण्यासाठी बाबा पद्मनजी यांनी ही कादंबरी लिहिली. हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथांचे दर्शन घडविण्यासाठी व ख्रिस्ती धर्माचे महत्व पटविण्यासाठी ही कादंबरी लिहिली असली तरी त्यातून तत्कालीन समाजाचे दर्शन घडते. समाजातील सुखदु:खाचे दर्शन घडविणे ही साहित्यिकांची जबाबदारी आहेच आहे. त्याला अनुसरून विचार केल्यास या कादंबरीचे मूल्य फार श्रेष्ठ दर्जाचे आहे. बाबा पद्मनजींनी प्रत्येक प्रकरणात हिंदूच्या अमानुष रितीरिवाजांचा परामर्श घेतला आहे व विधवांना त्यासाठी भोगावी लागणारी दु:खेही दाखविली आहेत. 'गोदू' हिने तर पती निधनाची नुसती बातमी कानावर येताच 'केशवपन' या अनिष्ट रुढीच्या भितेनेच विहरीत जीव दिला आहे तर वेणू ही वैधव्याचे दु:ख मुकाटपणे भोगणारी दुदैवी विधवा आहे. तिची साधी विचारपूस करायलाही कोणी नाही आणि जेव्हा यमुना जिव्हाळ्याने तिला विचारते तेव्हा ती आपला पती आजारी असतानाही हकिकत यमुनेला सांगते. या अशा हिंदूच्या अमानुष रुढीपरंपरेचा दबाव आपल्या कादंबरीच्या नायिकेवर म्हणजे यमुनेवरही पाडला होता. यमुनेच्या पतीने यमुनेचे केशवपन करु नये असे वचन घेतल्यामुळे पती निधनानंतर घरातील मंडळी गप्प बसली परंतु नंतर तिचे वपन करायचे ठणले व यमुनेने केशवपनास विरोध करू नये म्हणून तिला गुरुचरित्राची पोथी ऐकावयास लावली. कारण त्यात विधवांच्या आचारविचाराविषयी सर्व सांगितले होते. याबरोबरच पुरवणी अंकात हिंदू विधवांची दु:स्थिती असे प्रकरण जोडले आहे ते वाचूनही आपणास समजते की हिंदूच्या रुढीमुळे विधवांना किती असहाय्य दु:ख भोगावे लागते.

'यमुना पर्यटन' या पहिल्या कादंबरीचे स्वरुप खात्रीनेच इतके महत्त्वपूर्ण आहे की तिची साक्षेपाने चर्चा व्हावी. सामाजिक परिस्थितीबद्दल कळकळ, समाजातील एका विशिष्ट वर्गाच्या दु:खाबद्दल तीव्र जाणिव हा या कादंबरीचा प्राण आहे. पद्मजींनी जो सामाजिक प्रश्न कादंबरीत चर्चेसाठी घेतला तो त्या काळच्या केवळ ख्रिस्ती समाजालाच महत्वाचा वाटत होता असे नाही तर समग्र समाजापुढे हा प्रश्न एक भयानक समस्या म्हणून उभा राहिला होता. महाराष्ट्रातील विधवांच्या शोचनीय अवस्थेचे अत्यंत हृदयद्रावक वर्णन या कादंबरीत केले आहे. या कादंबरीत यमुनेचा प्रवास दुहेरी आहे. एकतर ती त्र्यंकाहून नागपूर तेथून पंढरपूर मग सातारा आणि पुन्हा त्र्यंबक असा भौगोलिक प्रवास करते आणि दुसरा म्हणजे हिंदू धर्मातून ख्रिस्ती धर्मापर्यंत यमुनेचा प्रवास होतो.

यमुनेच्या भौगोलिक पर्यटनात प्रथम आपणाला भेटते ती 'गोदू' पतीच्या निधनामुळे निर्माण झालेल्या प्रसंगातून गोदूची दयनीय परिस्थिती व तिने केलेली आत्महत्या व त्यानंतर आप्त स्वकियांची प्रतिक्रिया हे फारच भयंकर आहे. त्यानंतर भेटते ती वेणू वेणूची हकिकत ऐकल्यावर हिंदू विधवांना किती असह्याय्य दु:ख भोगावे लागते हे तर समजतेच पण त्यावेळच्या समाजाच्या अंधश्रद्धाळू विचारसरणीचीही साक्ष पटते. पुढे विनायक व यमुना नागपुरला आल्यावर विनायकाचा मित्र दौलतराव यांच्या मामेबहिणीची कहाणी यमुनेला ऐकायला मिळते. पुढे पंढरपूरहून साताऱ्याला येताना वाटेत भेटलेली कुळंबीण किंवा भिक्षेकरी विधवा यांच्या गोष्टी समजतात.

साताऱ्याला जगन्नाथ सोनाराकडे यमुना व विनायक उतरताच यजमानांच्या पुत्रोत्सवाच्या निमित्ताने बरीच मंडळी जमणार असतात. त्यासमोर पुनर्विवाहाच्या इष्टानिष्टतेवर वाद होतो व त्यात पुनर्विवाह पक्षाची सरसी होते. दुसरे दिवशी यजमानांचा निरोप घेऊन विनायक व यमुना परतीच्या प्रवासास लागले. जेजुरीजवळ छत्रीमुळे बैल बिचकून गाडीला अपघात होतो व त्यातच विनायकाचा अंत होता. तेव्हा यमुनेने केशवपन करावे म्हणून तिच्यावर दबाव आणला जातो पण यमुना, शिवराम व त्याची आई हे तिघे घर सोडून विनायकरावाच्या एका मित्राच्या घरी जातात आणि यमुना ख्रिस्ती धर्म स्विकारते व ,का शिलवान गृहस्थाशी पुनर्विवाह करते.

बाबा पदमजींची ही कथा लक्षात घेता असे ध्यानात येते की यमुनेच्या हिंदू धर्माकडून ख्रिस्ती धर्माकडे होणाऱ्या मानसिक प्रवासाची कथा आहे. तसेच 'यमुना पर्यटनची' रचना कादंबरी आणि लघुकथा यांच्या सीमेवरील आहे. बाबांना नुसती एका व्यक्तीची कहाणी सांगायची नव्हती त्यांना

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

सगळ्या समाजाचेच चित्र रेखाटण्याचे होते. गोंदू, वेणू व शिवरामची आई या तीन विस्तृत कहाण्या म्हणजेच स्वतंत्र कथाच आहेत. या तीन कथा यमुनेच्या कथेत येऊन बसल्या आहेत. या कहाण्यातील दोन पात्रांनी स्वत:च भेटून कहाण्या सांगितल्या आहेत.

'यमुना पर्यटन' ही मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी आहे. मात्र काही टिकाकारात मतभेद आहेत. सरवटे यांनी मात्र निश्चितपणे हे स्थान 'यमुना पर्यटनला' मराठीतील स्वतंत्र कादंबरीचे स्थान नि:संदिग्धपणे दिले आहे.[२] असे असले तरी या कादंबरीला काही मर्यादाही पडल्या आहेत. यमुनापर्यटन आर्थिकदृष्ट्या फारच यशस्वी आहे परंतु ख्रिस्ती धर्मप्रचारातील एक साधन म्हणूनच तिच्याकडे पाहिले जाते. वाचकवर्गात तिला फारशी लोकप्रियता मिळालेली नाही. या मर्यादेबरोबरच आणखी 'यमुना-पर्यटन' मध्ये घडण्याची शक्यता फारशी नव्हती.[३] जीवनदर्शनाची अगर व्यक्तीदर्शनाचे सामर्थ्य बाबाजवळ नव्हते. पोतदारांनी बाबांची भाषापद्धती फार गोड असून तिच्यात कळकळ व तळमळ भरपूर आहे असे मत दिले आहे याची शक्यता तारतम्यानेच घेतली पाहिजे. आशयाचा वास्तववाद असूनही कादंबरीत जिवंतपणा येण्यास अतिरेकी बोधवादाच्या मर्यादा पडतात. अशा आणखी काही मर्यादांचा विचार आपणाला करावा लागतो.

'मोचनगड' या गुंजीकरांच्या कादंबरीलेखनामागील प्रेरणांचा विचार करताना प्रथम आपणाला अभ्यासांती असे जाणवते की राष्ट्राभिमान जागृत करणे ही प्रेरणा असावी. गुंजीकरांना इतिहासाचे शुद्धीकरण करून खरा इतिहास लिहावयाचा होता. त्याकरिता त्यांनी विविधज्ञानविस्ताराच्या ऑक्टोबर १८७१ च्या अंकापासून "सर्व लोकास विनंती" या मथळ्याखाली मजकूर छापण्याची सुरुवात केली होती. त्यांत ते लिहतात, "ज्या देशाचा इतिहास त्या देशाच्या लोकांना माहित नसावा व तो त्यांनी परक्याकडून समजून घ्यावा ही मोठी लांछनाची गोष्ट आहे. आपल्या पूर्वजांनी अशा प्रकारच्या इतिहासाला साधने ठेवली नाहीत असे नाही त्यांनी अनेक बखरा लिहून ठेवल्या आहेत परंतु दिवसेंदिवस आमचे लोक हिंदूची कृत्ये तितकी निरुपयोगी अशा अयोग्य समजुतींत मग्न होऊन त्या अमूल्य लेखांपासून काही लाभ करून घेण्याकडे दुर्लक्ष करीत आहेत. आणखी अशी भिति वाटते की जर कोणी त्याकडे लवकर लक्ष न दिले तर थोड्याच दिवसात ते लेख अगदी निर्मूलन होऊन जातील. याकरिता ते सर्व मिळून त्या सर्वांच्या सहाय्याने मराठ्यांचा खरा इतिहास लिहण्याची आमची इच्छा आहे." इतिहासातील बीजे घेऊन ती फुलविणे, जनतेचा राष्ट्राभिमान जागृत करणे इतिहासाची ओळख नवीन पिढीला करून देणे या हेतूने प्रारंभीच्या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहल्या गेल्या.

'इतिहास काळातील जीवनाविषयी आस्था' या प्रेरणेतूनही 'मोचनगडची' निर्मिती झाली आहे. भावी काळात काही करण्याच्या आकांक्षेने ज्यांची मने भारली आहेत व जे काही करायचे ते आपल्या पूर्वपरंपरेशी सुसंगत असावे अशी ज्यांना तळमळ वाटत असते त्यानांच हो आस्था व आपुलकी वाटते. रा.भि.गुंजीकरांची 'मोचनगड' ही याच वृत्तीतून निर्माण झाली आहे.

इंग्रजी वाङ्मय वाचून गुंजीकरांना 'मोचनग ड' ही कादंबरी लिहण्यास प्रेरणा मिळाली असावी. ऐतिहासिक कादंबरीकारांच्या समोर आदर्श म्हणून स्कॉट व ड्युमा हे दोन लेखक होते. त्यातही ड्युमापेक्षा स्कॉट त्यांना जवळचा. इतकेच नव्हे तर 'मोचनगड' ही स्कॉटच्या कादंबरीचे रुपांतर आहे. अशा प्रकारचे विधानही त्याकाळी केले होते. परंतु हा आक्षेप खोटा आहे. श्रीपादकृष्ण कोल्हटकरांनी विविध ज्ञानविस्तारात 'मराठी कथात्मक वाङ्मय' या मथळयाखाली ''या अद्भुत कादंबऱ्या व प्रस्तुतच्या सामाजिक कांदबऱ्या यामध्ये ऐतिहासिक कादंबऱ्याची एक पायरी आवश्य होती व तिला सुरुवात गुंजीकरांच्या 'मोचनगड' पासून झाली. या कादंबरीचा काळ शिवाजी महाराजांचा घेतला व तिची रचना स्कॉटच्या कादंबऱ्याच्या धर्तीवर केली. हा लेख त्यांनी वाचला नसावा.

ऐतिहासिक कादंबरी म्हणून 'मोचनगडाच्या' स्वरुपाचा विचार करताना ऐतिहासिक कादंबरीत इतिहास व कल्पकता यांचे संमिश्रण कमी अधिक प्रमाणात आढळते. बखरीपेक्षा ऐतिहासिक कादंबरीचे स्वरुप निराळे आहे. 'मोचनगड' कोटल्यातरी ठराविक सदरात घालावयाची तर ती 'ऐतिहासिक' सदरातच घालावी लागेल. तथापि तिच्यात खरा ऐतिहासिक असा भाग थोडा असून काल्पनिक असाच भाग पुष्कळ आहे. ऐतिहासिक ललित वाङ्मयात खऱ्या घडलेल्या इतिहासाचे व काल्पनिक घटनांचे प्रमाण किती असावे हे ठरलेले नाही व ठरविता येणे शक्यही नाही. तथापि ग्रंथकारानेच आपल्या लेखनाला 'कल्पित गोष्ट' असेच नाव दिले आहे. ऐतिहासिक हा शब्द वापरलेला नाही. ऐतिहासिक कादंबरीत मुख्य घटना, मुख्य पात्रे किंवा काही घटना व काही पात्रे ऐतिहासिक असून चालणार नाही तर ऐतिहासिक कादंबरी ही ऐतिहासिक वास्तवाच्या कलात्मक आकलतावर आधारलेली असावी लागते.

घाशीराम कोतवाल हा नावापुरता ऐतिहासिक आहे तर त्याच्या नेमका उलट रा.भि.गुंजीकर यांचा मोचनगड नावापुरता काल्पनिक आहे. आणि तरीही गुजीकरांनी आपल्या लिखानाला 'कल्पित गोष्ट' असेच म्हटले आहे. कादंबरी म्हटले नाही परंतु ही 'कल्पित गोष्ट' केवळ कादंबरीच नव्हे तर 'ऐतिहासिक कादंबरी' या नावाला साजेशी आहे. 'मोचनगड' ही ऐतिहासिक कादंबरीचा एक आदर्श

नमुना आहे. गुंजीकरांना कादंबरीच्या उद्दिष्टाविषयी स्पष्ट कल्पना होती आणि 'विश्वासराव'या कादंबरीवरील परिक्षणात गुंजीकरांचे कादंबरीसंबंधी विचार काय होते ते कळून येते. कल्पित गोष्ट म्हणजे पृथ्वीच्या राहटीची नक्कल किंवा अनुकरण आहे.' ती जर आम्हास इतिहासावरून माहित अशा गोष्टीचा फरम्याची असली तर तीस चांगले आम्ही म्हणतो. गुंजीकरांनी रंगोपंत ठाणेदार, शामजी रांगडे इत्यादी 'मोचनगड' कादंबरीतील सर्व मुख्य पात्रे काल्पनिक घेतली आहेत व शेवटी महाराजांचे दर्शन एवढीच प्रत्यक्षा ऐतिहासिक पात्रे वापरली आहेत. जामगांव, दाजीपूर, एवढेच नव्हे तर 'मोचनगड' हे स्थळसुद्धा काल्पनिक घेतले आहे.

गुंजीकरांनी जुन्या चालीरीती, राज्यप्रकरणी काही अभिप्राय वातावरण निर्मिती, यांच्या सहाय्याने ऐतिहासिक सत्यामास निर्माण केला आहे. पाश्चात्य साहित्यातील ऐतिहासिक कादंबरीवरील विचारदेखील याच पद्धतीचे आहेत.

काल्पनिक घटनांच्या निवेदनाने ऐतिहासिक सत्याला धक्का न लागावा यादृष्टीने टीकाकारांनी एक पर्याय सुचविला आहे व अनेक विख्यात कादंबरीकारांनी त्याचा अवलंबही केला आहे. हा पर्याय म्हणजे ऐतिहासिक कादंबरीत वातावरण निर्मितीवर भर देऊन ऐतिहासिक दृष्टीने दुय्यम महत्वाच्या किंवा काल्पनिक व्यक्तींना कादंबरीत केंद्रस्थान देऊन कथानकाची रचना करणे हा होय. गुंजीकरांनीही 'मोचनगड' मध्येही ह्याच पर्यायाचा वापर केला आहे. तसेच स्कॉट बंकिम, हरिभाऊ आपटे या लेखकानीही हाच मार्ग अवलंबिलेला दिसतो.

'मोचनगड' विषयी बोलण्याची वेळी आली म्हणजे नेहमी गुंजीकरांना उपलब्ध असणाऱ्या ऐतिहासिक सामग्रीचा उल्लेख केला जातो. 'काव्येतिहाससंग्रहा' ला इ.स. १८७८ च्या नंतर आरंभ झाला म्हणून गुंजीकरांना बखर वाङ्मयसुद्धा फारसे उपलब्ध नव्हते. जणू असे साधनसाहित्य उपलब्ध असते तर गुंजीकरांनी 'मोचनगड' आहे यापेक्षा निराळ्या रीतीने लिहली असती. फक्त ग्रँट डफचा इतिहास उपलब्ध होता. अशा प्रकारे 'मोचनगडच्या' स्वरुपानंतर काही मर्यादांचाही विचार येथे केला आहे.

बखरी उपलब्ध नसल्या तरी ग्रँट डकचा इतिहास उपलब्ध होता आणि कोणत्याही बखरीपेक्षा इतिहासाला ग्रँट डक जास्त प्रामाणिक होता. 'मोचनगड' वाचकांच्या मनाची फारसी पकड होऊ शकले नाही याचे कारण काय असावे? हाही एक विचार करण्याजोगा प्रश्न आहे. मोचनगड

देशाभिमानाला थोडी फुंकर घालू शकली असती व वाचकांना सुखवू शणकली असती तसेही घडले नाही. हे न घडण्याचे कारण मोचनगडची गती कमालीची संथ आहे आणि रंजतवादी कादंबरीला ही संथ गती चालत नाही. इंग्रजी वाङ्मय वाचून गुंजीकर यांना 'मोचनगड' ही कादंबरी लिहण्याला प्रेरणा मिळाली. विशेषत: स्कॉटच्या कादंबऱ्या वाचून प्रेरणा मिळाली परंतू स्कॉटच्या कादंबरो लेखनापासून प्रेरणाहोऊन निर्माण झालेली कादंबरी खऱ्या अर्थाने ऐतिहासिक होणेच शक्य नव्हते.[४] मोचनगड ही कोणती नवी परंपरा सुरुवात करणारी कादंबरी नाही. ती मुक्तमालेच्या परंपरेतील तिच्यातील काही तांत्रिक अंगाच्या विकास करणारी व रंजनदृष्ट्या तिच्याहीपेक्षा कमी असणारो अशी कादंबरी आहे.

'यमुनापर्यटन' आणि 'मोचनगड' या दोन पायाभूत कादंबऱ्याच्या वाङ्मयीन विशेषांचा विचार करताना या दोन्ही कादंबऱ्या पयाभूत असल्या तरी वाङ्मयीनदृष्ट्या किती सरस आहेत हे आपल्या लक्षात येते. यासाठी प्रत्यय आपणाला 'यमुनापर्यटन' या कादंबरीच्या वाङ्मयीन विशेषांचा विचार करावा लागेल.

यमुनेच्या द्विविध पर्यटनाची कथा बाबा पद्मजींनी सांगितली आहे. यमुनेने आपल्या पतीसमवेत सुरु केलेला प्रवास हे भौगोलिक पर्यटन आणि मिशनऱ्यांच्या शाळेत शिकलेली यमुना अनेक अनुभवातून जाताना इतरांना येशूचा, तारणाचा उपदेश करीत-करीत स्वत: ख्रिस्तचरणी लीन झाली हे तिचे वैचारिक पर्यटन. विधवांचा प्रश्न आणि धर्मांतरांचा प्रश्न या दोन्हींची गलत म्हणा की साधेजोड म्हणा बाबांनी या पुस्तकात केली आहे. या कारणामुळे या पुस्तकाच्या स्थानाविषयी शंका उद्भवली आहे ही शंका 'यमुनापर्यटन' ही कादंबरी आहे की नाही येथपर्यंत गेली आहे. यमुनेच्या पर्यटनात तिला दिसलेली दृश्ये-सुटी-सुटी आहेत. तरीही या कालखंडात कथा आणि कादंबरी यांच्यात रचनेच्या दृष्टीने पुष्कळ देवाणघेवाण होत होती. अनेक विधवांच्या कथा सुट्या-सुट्या असल्या तरी यमुनेवरील संस्काराच्या एक हेतुकतेमुळे बाबांच्या रचनेला कादंबरी म्हणजेच योग्य ठरेल.

यमुनापर्यटनाचे एक विशेष वैशिष्ट्य डोळ्यात भरते ते म्हणजे कथानकाच्या साध्या सरळ स्वरुपात अविष्कृत झालेला वास्तववाद बाबा पद्मनजींनी जे विधवा स्त्रियांच्या दु:स्थितीचे वर्णन केले आहे ते वास्तव आहे. त्यात अतिशोक्ती नसल्याचे त्यांनी दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत नमूद केले आहे. गोदू, वेणू, शिवरामची आई, भटीणबाई इ. अनेक विधवांच्या हकीकती एकत्र आणून नंतर कादंबरीची नायिका यमुना हिला स्वत: त्या परिस्थितीतून जाण्यास लावून इष्ट प्रमेयाची मांडणी

केली आहे. बाबा पद्मनजींनी आपल्या सामाजिक कादंबरीत केशवपन करणे इष्ट की अनिष्ठ पुनर्विवाहाला परवानगी द्यावी की न द्यावी अशा प्रश्नांची तपशिलवार चर्चा घेतली आहे व त्या चर्चांना शास्त्रीय आधार दिलेला आहे.

बोधवादी कादंबरी म्हणून यमुना पर्यटनचा विचार करताना यमुनेचा प्रवास हा दुहेरी आहे. म्हणजे हिंदू धर्मापासून ख्रिस्ती धर्मापर्यंतचा यमुनेचा प्रवास. पैशाच्या लोभाने यमुनेला शाळेत पाठविले. हे बाबा सांगतात व प्रभारंपासून बाबांनी यमुनेला मनाने ख्रिस्ती बनविले आहे. हरिभाऊंच्या नायिकेचे नावही यमुना आहे परंतु हरिभाऊ आपल्या नायिकेचा पुनर्विवाह दाखवू शकले नाहीत. ख्रिस्ती धर्म यमुनेने स्विकारला असल्यामुळे बाबांना तेथपर्यंत जाता आले. पहिला पती विसरताना यमुनेला काही अडचणी आपल्या नाहीत व विनायकरावालासुद्धा ख्रिस्ती झाल्याशिवाय मरु देणे बाबांना इष्ट वाटले नाही. ती व्यवस्था त्यांनी आधीच करून ठेवली होती या दृष्टीने बोधवादी कादंबरी म्हणून आपण यमुनापर्यटनकडे पाहू लागलो तर या कादंबरीचे चित्र बरेच बदललेले दिसते. विधवांच्या जीवनाचे जे पंढरपूर क्षेत्राचे जे वर्णन आपण केले आहे ते अतिरंजीत नसून वास्तविक आहे हे वाचकांना पटावे अशी बाबांची इच्छा आहे. कारण आपण जे लिहतो आहोत ते कल्पनेचा खेळ नसून वास्तवच आहे हे सांगण्याचा आग्रह बोधवादी लेखकांना होत असतो. यावरून यमुना पर्यटन ही एक बोधवादी कादंबरी आहे याचे प्रत्यंतर पटते. रंजनवादी कादंबऱ्याप्रमाणे बोधवादही खोटे, स्वप्नाळू रंग आणि कृत्रिम कथानकाची मांडणी स्विकारते.

दत्तो वामन पोतदार बाबांच्या भाषाशैलीबद्दल म्हणतात, ''बाबांची भाषापद्धती खरोखरच फार गोड आहे. त्यात भक्तीचा जिव्हाळा आहे, समाज सुधारणेची तळमळ आहे, वाक्ये शुद्ध, साधी सरस व चटकदार आहेत. लिहणे गंभीर व प्रौढ आहे. शब्द वेचक आहेत. वळण जरा कोकणी आहे. त्यांची गोड भाषा व टापटिपीची मांडणी पाहता बाबांची गणना उत्तम मराठी लेखकात केली पाहिजे. बाबांनी अशिक्षित आणि पददलित असलेल्या स्त्रियांची हकीकत सांगताना भाषा शक्य तितकी सोपी ठेविली. तिच्या सोपेपणाचे वळण म्हणजे छोटी-छोटी आणि किंचित मिशनरी वळणाची वाटणारी वाक्ये. याबरोबरच वस्तूस्थितीच्या सुक्ष्म व व्यापक अवलोकनावर बाबांची कादंबरी आधारलेली आहे. या अवलोकनाला एका मानवतापूर्ण दृष्टीकोनाची जोड मिळाली आहे. म्हणून त्यांची घरगुती प्रसंगाची वर्णने वाचकाच्या मनाची पकड घेतात.

या विशेषाबरोबर बाबांची मार्मिक निरिक्षणपद्धती, हिंदू-धर्मशास्त्र व त्यांचे ज्ञान, मानवी स्वभावाचे परिक्षण वादविवाद पटुत्व मुग्ध विनोदारीलता, ढोंग व दंभ याविषयीची चीड वरवर सहानुभूती दाखवून फुकट मोठेपणा मिळविण्याचा यत्न करणाऱ्या लोकांवर त्यांनी ओढलेले कोरडे, शब्दचित्राने अचूक कल्पनाचित्र उत्पन्न करण्याची त्यांची विलक्षण हातोटी वगैरे विशेष यात पहायला मिळतील.[५]

'मोचनगड' या कादंबरीच्या वाङ्मयीन विशेषांचा विचार करताना प्रथम आपणाला दिसतो तो गुंजीकरांचा द्रष्टेपणा, 'मोचनगड' लिहताना महाराष्ट्राच्या ऐतिहासिक सत्याचे स्वरूप काळाने भ्रष्ट होणार नाही याबद्दल गुंजीकरांनी आरंभापासून काळजी घेतली आहे. याच्यावरून त्यांच्या द्रष्टेपणाची प्रचिती येते. गुंजीकरांना ऐतिहासिक महत्कथा लिहायची नव्हती तर त्यांना ऐतिहासिक कादंबरी लिहायची होती म्हणून त्यांनी पात्रे, प्रसंग व स्थळ काल्पनिक घेऊन जुन्या चालीरीती व वातावरण यांच्या सहाय्याने ऐतिहासिक सत्याभास निर्माण करून आभास उत्पन्न करण्याकरिता पार्श्वभूमीवर एखादे दुसरे खरे ऐतिहासिक पात्र ठेवले आहे. यावरून गुंजीकरांना ऐतिहासिक कादंबरीच लिहायची आहे व द्रष्टेपणाने पुढच्या पाऊणशे वर्षात निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा अगोदरच विचार केलेला आहे.

'मोचनगड' या कादंबरीचा एक मनोज्ञ विशेष म्हणजे वातावरण निर्मिती हा होय. पूर्वेतिहासाच्या आस्थेने प्रस्फुरीत होऊन व त्या काळाविषयी फार थोडी माहिती उपलब्ध असूनही त्यातील वातावरणाशी समरस होऊन गुंजीकरांनी 'मोचनगड' ही कादंबरी लिहली. इतर लेखक सरमिसळीने अद्‌भूतरम्यता निर्माण करण्यात गुंतले होते तेंव्हा गुंजीकर विशुद्ध वातावरणाची भाषा सरळ साधी पण भावगर्भ आहे. जामगांवतील जुन्या वाड्याचे वर्णन करताना, ''तो इमानी दिवा आपल्या अब्रूदार धन्याच्या घराची जीर्णावस्था प्रेक्षकांच्या नजरेला न आणण्याविषयी आपणाकडून होईल तितकी मेहनतच करीत आहे असे दिसे.'' अशी उत्प्रेक्षा ते करतात. जामगांवच्या वाड्याचे वर्णन करून आभावितपणे मोगलांच्या राजवटीतील देमुखांच्या उतरत्या कळेचे व कळानिष्ठ घरंदाज जीवनाचे सूचक चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे करतात. गुंजीकरांची भाषा ही हळवे यांच्या मानाने अधिक प्रवाही व प्रसंग डोळ्यासमोर उभी करणारी आहे.

ऐतिहासिक कांदबरीकाराला त्या काळातील वातावरणाशी समरस व्हावे लागते. म्हणजे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

थोडक्यात त्या काळातील रितिरिवाज, रुढी, परंपरा याचे वर्णन वाचकांना घडवावे लागते. त्याप्रमाणे गुंजीकरांनीही पत्नीने पतीच्या ताटात जेवणाची पद्धत दानधर्म करण्याची रुढी लहान मुलांना कोणतीही गोष्ट विचारणे व ती सांगेल ते खरे मानण्याची रीत, ओटी भरणे अशा रिति रिवाजाबरोबर जुन्या काळात लोकांचा भूत पिशाच्यावर असणारा विश्वास, त्यांना हाकलून लावण्यासाठी केलेले उपाय अशा काही श्रद्धांचाही उल्लेख मोचनगडमध्ये आला आहे. सांकेतिक निसर्गवर्णने देऊन नंतर कथानकाला प्रारंभ करण्याचीरित मोचनगडमध्ये प्रथम दिसते. गुंजीकर एखादा सामान्य प्रसंगही तपशिलाने सांगतात. या दृष्टीने जनोबा आजोळी पाहचतो हा प्रसंग पाहण्यासारखा आहे.

विनोद निर्मिती हा एक 'मोचनगड' या विशेष महत्त्वाचा आहे. कारण 'मोचनगड' पासूनच प्रेरणा घेऊन हरिभाऊ आपटे यांनी आपल्या कादंबरीत विनोदनिर्मिती केली आहे. गुंजीकरांचा दौलत्या हा हरिभाऊ आपट्यांच्या सावळ्याचा पूर्वज आहे असे आपणाला म्हणता येईल. पात्रांच्या बाह्यरुप वर्णनाचा तपशिलही गुंजीकरांनी दिला आहे. यासाठी गणपतरावांचे वर्णन किंवा पाटलांच्या पोशाखाचे केलेले वर्णन पाहण्यासारखे आहे. जुन्या काळाची आटवण करून देणारे प्रसंगही 'मोचनगड'मध्ये आहेत. जामगांवचा जुना वाडा, पिशाच्याच्या भितीने लहान मुलांना दडपूत निजवणाऱ्या आजीबाई, सटव्या शिलेदारचे वर्णन दरोडेखोराशी झटापट ठाणेदाराच्या कोठडीत गंगूबाईवरील दु:खकारक प्रसंग, जुन्या पिढीतील नवरा-बायकोची रहस्यातील बोलणी हे सर्व प्रसंग जुन्या काळाची आटवण करून देतात.

गुंजीकरांनी आपल्या कादंबरीत रेखीव शब्दचित्र रेखाटले आहे. त्यांनी शिवाजीचे महाराजांचे केलेले वर्णन हे प्रारंभीच्या ऐतिहासिक कादंबरीतल हे शिवाजीचे शब्दचित्र त्या काळ्या मानाने रेखीवच म्हणावे लागेल.

संदर्भ टीपा

१. रा.श्री.जोग (मराठी वाङ्मयचा इतिहास खंड - ४) महाराष्ट्र साहित्य परिषद प्रकाशन, दुसरी आवृत्ती १९७३. पृष्ठ २६२)

२. कुसुमावती देशपांडे (मराठी कादंबरीचे पहिले शतक) मराठी साहित्य संघ, मुंबई प्रथमावृत्ती २० जुलै १९५३. पृष्ठ क्रमांक २०

३. नरहर कुरुंदकर (धार आणि काठ) देशमुख आणि कंपनी पुणे पहिली आवृत्ती - २७ एप्रिल १९७१. पृष्ठ २०

४. नरहर कुरुंदकर (धार आणि काठ) देशमुख आणि कंपनी पुणे पहिली आवृत्ती - २७ एप्रिल १९७१. पृष्ठ ३८

५. बाबा पद्मनजी (यमुना पर्यटन) स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. आवृत्ती चौथी १९३७. प्रस्तावना पृष्ठ ९८.

परिशिष्ट - १

दुर्मिळ अक्षरधन

अर्वाचीन मराठीतील आद्य ग्रंथकार बाबा पदमनजी

मराठी ख्रिस्ती साहित्यिक म्हटले की, सर्वप्रथम आठवण होते. ती बाबा पदमनजी यांची. इतके त्यांचे नाव मराठी ख्रिस्ती वाङ्मयाशी निगडित झाले आहे. अर्वाचीन मराठीतील आद्य ग्रंथकारांपैकी ते एक. त्यांनी लहान-मोठी मिळून शंभराहून अधिक पुस्तके लिहली. त्यांच्या इतकी ग्रंथरचना एकोणिसाव्या शतकात दुसऱ्या कोणत्याही लेखकाच्या हातून झाली नाही. त्यांच्या अफाट ग्रंथसंपदेतील बरेचसे लेखन ख्रिस्ती धर्माच्या प्रसारासाठी झाले असले, तरी आद्य कादंबरीकार, आत्मचरित्रकार, निबंधकार आणि त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे कोशरचनाकार म्हणून त्यांनी केलेली कामगिरी अविस्मरणीय अशी आहे.

बाबा पदमनजी (१८३१-१९०६) चे आडनाव मुळे. जन्म बेळगावचा, जात कासार व त्यांच्या घराण्याचा मूळ धंदा जवाहिऱ्याचा. बाबांचे वडील पदमनजी माणिकजी कॅ. जर्व्हिसच्या तंत्रविद्यालयात शिकून सर्व्हेअर झाले होते. बाबांचे शिक्षण बेळगाव आणि मुंबईला झाले. बाबा ब्राम्हणेतर जातीत जन्माला आले असले, तरी त्यांच्या घरातील वातावरण कर्मठ ब्राह्मणी होते. घरात सोवळे - ओवळे फार चालत असे. घरातील धार्मिक वातावरणामुळे बाबांना लहानपणी कथा - पुराण ऐकण्याचा नाद लागला होता. संस्कारशील कोवळ्या वयात त्यांच्या मनावर हिंदू धार्मचा इतका पगडा बसला होता की, मिशनऱ्यांनी केलेली निंदानालस्ती ऐकून त्यांना अतोनात राग येईल. बेळगावच्या शाळेत एकदा ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी हिंदूच्या दैवतांवर केलेली टीका वाचून रागाने त्यांनी ते पुस्तक फाडून त्याच्या चिध्या - चिंध्या केल्या होत्या.

प्रांजल निवेदन -

मुंबईला फ्री चर्च मिशनमध्ये रेव्हरंड शेषाद्री या विद्वान शिक्षकांशी बाबांचा स्नेह जुळला. तिथे बाबा एका वर्गात बायबलही शिकवू लागले. त्यासाठी ख्रिस्ती धर्माचा सखोल अभ्यास त्यांनी केला. तरीही स्व-धर्मावरची त्यांची श्रद्धा कमी झाली नव्हती. पुढे डॉ. मिचेल. रेव्हरंड निस्बिस, ज्ञानोदयाचे संपादक मि. ह्यूम यांच्याशी निकट स्नेह जडल्यावरच त्यांना 'ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेची प्रमाणे दिसू लागली.' बाबांनी 'अरूणोदय' या आपल्या आत्मचरित्रात म्हटले आहे, 'ज्ञानोदयाने

माझी ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेविषयी व हिंदू धर्म ईश्वरप्रणीत नाही, याविषयी खात्री केली. प्रभाकराने माझ्या मनात ब्राह्मणांविषयी जी पूज्यबुद्धी होती, ती नष्ट केली आणि ज्ञानप्रकाशाने नास्तिक मताकडे माझी प्रवृत्ती होऊ दिली नाही.' हिंदू धर्मातील मूर्तिपूजा, जातीभेद, व्रतवैकल्ये, अंधश्रद्धा, वेदान्ताचा शुष्क काथ्याकूट इत्यादीची जाणीव झाल्यानेच ख्रिस्ती धर्माकडे आपला ओढा कसा वाढत गेला व अखेर ३ सप्टेंबर १८५४ रोजी आपण बाप्तिस्मा कसा घेतला, याची हकीकत बाबांनी विस्ताराने 'अरुणोदय' मधून सांगितली आहे. बाबांचे हे आत्मचरित्र म्हणजे त्यांचे 'हिंदूधर्मसंबंधी जिणे व ख्रिस्ती होणे' याचीच साद्यंत कहाणी आहे. धर्मांतराचा निर्णय घेताना त्यांच्या अंत:करणात उठलेल्या कोलाहलाचे व विचार परिवर्तनाचे फार मार्मिक वर्णन बाबांनी केले आहे. तत्कालीन समाजवास्तवाचा वेध घेणारे त्यांचे प्रांजल निवेदन हा मराठी साहित्यातील अमोल ठेवा आहे.

बाबांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यावर काही दिवसांतच हिंदू विधवांच्या दु:स्थितीचे वर्णन करणारी 'यमुनापर्यटन' कादंबरी लिहली. व्याकरणकार दादोबा पांडुरंगांनी 'विधवाश्रुमार्जन' हा आपला संस्कृत निबंध व त्याचे मराठी भाषांतर या कादंबरीच्या पहिल्या आवृत्तीत समाविष्ट केले होते.

ख्यातनाम निबंधकार -

निबंधकार म्हणूनही बाबा पदमनजी यांनी त्या काळी बरीच ख्याती मिळवली होती. त्यांचा पहिला निबंध मात्र कधीचन लिहिला गेलेला होता. शाळेत बाबांना तपकिरीचे व्यसन लागले होते. प्रसिद्ध ग्रंथकार गोविंद नारायण माडगावकर त्यांचे शिक्षक होते. घरचा तपकिरीचा व्यवसाय असलेल्या माडगावकरांनी तंबाखूपासून होणारे तोटे व हानी यावर निबंध लिहून आणायला सांगितले होते. वर्गात मुलांनी आपपले निबंध वाचून दाखवले. बाबांनी काहीच लिहिले नव्हते. परंतु जेव्हा त्यांची पाळी आली. तेव्हा ते उभे राहिले व म्हणाले, 'आजपासून मी तपकिर ओढण्याचे सोडून दिले. हाच माझा निबंध.' तंबाखूच्या विरुद्ध असणाऱ्या माडगावकरांना त्यांचा हा अलिखित निबंध ऐकून फारआनंद झाला. ग्रंथ हे शस्त्रांप्रमाणे असतात, असे मानणाऱ्या बाबांनी 'दारू हा अट्टल चोर', 'ऋणाग्नि', 'होळिका राक्षसीण' 'पुनर्विवाह प्रतिबंधक चाल', 'खोट्या शपथेचे महापातक', 'लाच घेण्याची दुष्ट चाल', 'असत्य नामक राक्षस', 'स्त्रियांस अज्ञानात ठेवण्याची समजूत', 'मलीनता नामक अवदसा' इत्यादी समाजातील शत्रूंविरुद्ध अनेक निबंध लिहिले. बाबांच्या निबंध वाङमयातील

'स्त्री विद्याभ्यास निबंध' वाङ्मयातील 'स्त्री विद्याभ्यास निबंध', 'व्याभिचार-निषेध बोध', 'कुटुंबाची सुधारणा', हिंदू लोकांच्या सणांविषयी निबंध' व 'जातिभेद विवेचन' ही पाच पुस्तके विशेष महत्त्वाची आहेत.

आद्य मराठी कादंबरीकार व मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचे जनक म्हणून बाबा पदमनजी यांना मिळालेली ख्याती यथोचित असली, तरी कोशरचनाकार म्हणून त्यांनी केलेली महत्त्वाची कामगिरी दुर्लक्षितच राहिली.

मोल्सवर्थ व कँडी यांचे प्रचंड कोश सर्वसामान्य अभ्यासकांच्या खिशाला परवडणारे नव्हते. ही गोष्ट ध्यानी घेऊन बाबांनी आधी कँडीच्या इंग्रजी-मराठी शब्दकोशाचा संक्षेप केला. तो १८६० साली प्रकाशित झाला. नंतर १८६३ साली मोल्सवर्थच्या मराठी-इंग्रजी कोशाचा संक्षेप बाबांनी केला. हे दोन्ही संक्षेप असले, तरी त्यातील शब्दांची व अर्थाची मांडणी यात वेगळेपणा आहे. या दोन संक्षिप्त कोशांशिवाय बाबांनी गृहोपयोगी व शालोपयोगी असा संस्कृत-मराठी चिमुकला कोश (पॉकेट डिक्शनरी) १८९१ साली प्रसिद्ध केला. त्यात रूढ व्यावहारिक संस्कृत शब्दांचे अर्थ दिले आहेत.

'मराठीतील थिसॉरस' -

कँडीच्या कोशाचे संक्षिप्तीकरण करीत असतानाच बाबांनी एका अभिनव, स्वतंत्र कोशाची रचना केली. त्याचे नाव 'शब्दरत्नावली'. १८६० साली प्रसिद्ध झालेल्या या शब्दकोशाची मांडणी बाबांनी इंग्रजीतील्या सुप्रसिद्ध रॉजेट थिसॉरसच्या धर्तीवर केली आहे. मराठीतला अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न. परंतु तत्कालीन समाजाला त्याचे महत्त्व कळले नाही, असेच म्हणावे लागेल कारण शब्दरत्नावलीची नंतर पुन्हा एकही आवृत्ती निघाली नाही. अहमदनगरच्या डॉ. के. सी. कऱ्हाडकर यांनी आपल्या 'बाबा पदमनजी : काल व कर्तृत्व' (१९७९) या पुस्तकातून हा कोश पुनर्मुद्रित केला नसता, तर आज अभ्यासकांना तो पाहायला मिळणेही अवघड झाले असते.

'शब्दरत्नावली' चे एकूण तीन भाग आहेत. पहिल्या भागात मोल्सवर्थच्या कोशातील ३५८ मूळ पारिभाषिक शब्द असून त्यांचे अर्थविस्तार प्रदर्शक शब्द ४,८५३ आहेत. दुसऱ्या भागात मुख्यत्व कँडीच्या कोशातील मूळ शब्द २६५ आहेत व त्यांचे उपशब्द व पर्यायवाचक शब्दमिळून ६८५२ आहेत. असे एकूण ११,७०५ शब्द कोशात आहेत. दोन्ही भागांच्या शेवटी दोन सूची दिल्या आहेत.

SHIVAJI UNIVERSITY ... HAPUR

पहिलीत सर्व शब्दांचे इंग्रजी अर्थ स्पष्ट केले आहेत व दुसरीत इंग्रजी शब्दांवरून कोशातील पर्यायी शब्दाचे मूळ पाहता यावे, अशी सोय केली आहे. पहिल्या भागाचे स्वरूप संख्याकोशासारखे तर दुसऱ्या भागाचे पर्यायकोशासारखे आहे. भांडी या शब्दाखाली ६९ भांड्यांची नावे, तर मूर्ख या शब्दाखाली ४७ पर्यायी शब्द आहेत. शब्दरत्नावलीचे स्वरूप लक्षात येण्यासाठी वानगीदाखल एका शब्दाचे दिलेले पर्यायाची शब्द पाहा -

बायको : स्त्री, अंगना, नारी, नार. नरी. अबला. कामिनी, महिला, वधू, ललना, ललिता, रमणी, रमा, वनिता, पद्मिनी, चित्रिनी, शंखिनी, हस्तीनी, नागकन्या, गंधर्वकन्या, यक्षिण, अप्सरा, रंभा, कोपना, भामा, भाभिनी, पतिव्रता, सती, साध्वी, सुचरित्रा, कुलांगना, कुलवधू, कुलस्त्री, कुलपालिका (लड्ड), फातमाय, फतेलश्कर, ढमाली, ढब्बू, पखालपार्वती-सुवासिनी, सौभाग्यवती, सधवा.

बायको (लग्नाची) - कबिला, बाईल, कुटुंब, भार्या, पत्नी, जाया, दारा, गृहिणी, वल्लभा, भाजा, कलव, खटला, अर्धांग, वामांग.

शब्दरत्नावलीचा उपयोग काय व कोणास हे सांगताना बाबांनी प्रस्तावनेत म्हटले आहे, ''ही चोपडी अनेक प्रकारच्या मसाल्याच्या व किराण्याच्या थैलीप्रमाणे आहे. ती जर कुशल स्वयंपाक्याच्या हाती पडली तर तो परोपरीची अन्ने सिद्ध करण्यास जे जिन्नस पाहिजेत तेच परिमित मानाने घेऊन आपल्या पाकास सुवास, रूची, माधुर्य व पुष्टता आणील. परंतु ज्यास ही अन्नसिद्धी कशी करावी हे माहीत नाही, त्यांच्या हाती ही चोपडी गेली असता तो कसा काला करील हे सांगवयास नको.' 'शब्दरत्नावरील'च्या संदर्भात बाबांनी म्हटले होते की, ''ही केवळ पुढे उभारावयाच्या एका मोठ्या इमरतीची भूमिका किंवा पाया आहे, असेच समजावे,'' दुर्दैवाने अशी इमारत उभारण्याचे काम मराठीत आजवर झाले नाही व बाबांची ही मनीषा साकाली गेली नाही.

- अविनाथ सहस्रबुद्धे

परिशिष्ट - २

१८०० ते १९२० या कालखंडातील सामाजिक कादंबऱ्या

१. यमुना पर्यटन - बाबा पदमनजी - १८५७.

२. रहाळकर - नारायणराव आणि गोदावरी १८८९.

३. विनायक ओक - शिरस्तेदार - १८८१.

४. हरिभाऊ आपटे - मधली स्थिती - १८८५.

५. हरिभाऊ आपटे - गणपतराव - १८८७-८८ अपूर्ण.

६. हरिभाऊ आपटे - पण लक्षात कोण घेतो - १८९०-९३.

७. हरिभाऊ आपटे - यशवंतराव खरे - १८९२-९५.

८. हरिभाऊ आपटे - मी १८९३-९५.

९. हरिभाऊ आपटे - जग हे असे आहे - १८९७-९९.

१०. हरिभाऊ आपटे - भयंकर दिव्य -१९०१-०३.

११. हरिभाऊ आपटे - आजच - १९०८-०६.

१२. हरिभाऊ आपटे - मायेचा बाजार - १९१०-१२ अपूर्ण.

१३. हरिभाऊ आपटे - कर्मयोग - १९१३-१७ अपूर्ण.

१४. नाथमाधव - डॉक्टर.

१५. नाथमाधव - विमलेची ग्रहदशा.

१६. नाथमाधव - ग्रहदशेचा फेरा.

१७. नाथमाधव - सापत्नभाव.

१८. ना. ह. आपटे - वैभवाच्या कोंदणात.

१९. ना. ह. आपटे - भाग्यश्री.

२०. ना. ह. आपटे - याला कारण शिक्षण.

२१. ना. ह. आपटे - पहाटेपूर्वीच्या काळोख.

२२. ना. ह. आपटे - सुखाचा मूलमंत्र.

परिशिष्ट - ३

१८०० ते १९२० या कालखंडातील ऐतिहासिक कादंबऱ्या

१. रा. भि. गुंजीकर - मोचनगड - १८७१.

२. नागेश विनायक बापट - संभाजी.

३. नागेश विनायक बापट - चितुरगडचा वेढा.

४. नागेश विनायक बापट - पानिपतची मोहीम - १८९७.

५. विष्णू जनार्दन पटवर्धन - हंबीरराव व पुतळाबाई - १८८५.

६. विष्णू जनार्दन पटवर्धन - जुनावाडा - १८६९.

७. चिं. मो. आपटे - पुतळाबाई - १८८९.

८. हरिभाऊ आपटे - म्हैसूरचा वाघ - १८९०-९१.

९. हरिभाऊ आपटे - उष:काल - १८९५-९७.

१०. हरिभाऊ आपटे - केवळ स्वराज्यासाठी - १८९८-९९.

११. हरिभाऊ आपटे - रुपनगरची राजकन्या - १९००-०२.

१२. हरिभाऊ आपटे - चंद्रगुप्त - १९०२-०४.

१३. हरिभाऊ आपटे - गड आला पण सिंह गेला - १९०३.

१४. हरिभाऊ आपटे - सूर्योदय - १९०५-०८.

१५. हरिभाऊ आपटे - मध्यान्ह - १९०६-०८.

१६. हरिभाऊ आपटे - सूर्यग्रहण - १९०८-०९.

१७. हरिभाऊ आपटे - कालकूट - १९०९-११ अपूर्ण.

१८. हरिभाऊ आपटे - वज्राघात - १९१३-१५.

१९. नाथमाधव - सावळ्या तांडेल - १९०८.

२०. नाथमाधव -स्वराज्याचा श्रीगणेशा - १९२१.

२१. नाथमाधव - स्वराज्याची घटना.

२२. नाथमाधव - स्वराज्याच्या स्थापना.

२३. नाथमाधव - स्वराज्याचा कारभार.

२४. नाथमाधव - स्वराज्यावरील संकट.

२५. नाथमाधव - स्वराज्याचे परिवर्तन.

२६. नाथमाधव - स्वराज्यातील दुफळी - १९३०.

२७. सहकारी कृष्ण - शापित महाराष्ट्र.

२८. सहकारी कृष्ण - राजकुंवर.

२९. ना. ह. आपटे - अजिंक्यतारा - १९०८.

३०. ना. ह. आपटे - राजपुतांचा भीष्म - १९११.

३१. ना. ह. आपटे - लांच्छित चंद्रमा - १९०९.